# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>(अनुज्ञापन अतिक्रमण निर्मूलन खाते)</u>

<u>क्रमांक सआ/एम-प / ई - 2000 /अति.निर्मू.दिनांक 09.11.2023</u>

## <u>एम/पश्चिम विभाग</u>

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

## <u>जाहिरात</u>

**विषयः-** एम/पश्चिम विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर अशासकीय संस्थेकडून माहे 28.11.2023 ते 20.03.2024 पर्यंत कामगार घेण्याबाबत.

एम/पश्चिम विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर कामगार घेण्याबाबत एका अशासकीय संस्थेची निवड करण्यात येणार आहे. सदर वाहनावर काम करण्याचा अनुभव असणाऱ्या किंवा महानगरपालिकेच्या इतर विभागामध्ये कामगार पुरवठा केल्याचा अनुभव असणा-या संस्था, तसेच एम/पश्चिम विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत अशासकीय संस्था, नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, रोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था इत्यादी संस्थाकडून अर्ज मागवण्यित येत आहेत. संस्थेची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करण्यात येईल. निवड झालेल्या संस्थेकडून प्रति दिन सकाळी ०८.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत ( सकाळ/संध्याकाळ सत्र ) एकूण – 08 कामगाराची आवश्यकता आहे.

एम/पश्चिम विभाग कार्यालय, दुसरा मजला, वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अति.निर्मू.) यांच्या कार्यालयात कामाच्या रक्कमेच्या रुपये अंदाजे ०.१२ टक्के अधिक १८ टक्के GST रोख स्वरुपात भरुन (ना परतावा) दि. 16.11.2023 ते दि 22.11.2023 पर्यंत सकाळी 10:30 ते दुपारी 01:00 वाजेपर्यंत अर्जाचा नमुना मिळू शकेल. अर्ज करण्याचा कालावधी दिनांक 16.11.2023 पासून दिनांक 21.11.2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी 10.30 ते 05.30 असेल. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक 22.11.2023 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत असेल. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सोडत दिनांक 22.11.2023 रोजी दुपारी ठिक 03.00 वाजता काढण्यात येईल.

निकषानुसार पात्र असलेल्या संस्थेच्या सूचीमधून सोडत पध्दतीने निवड झालेल्या संस्थेला योजनेच्या अटी व शर्तीसापेक्ष सहाय्यक आयुक्त, **एम/पश्चिम विभाग हे कामाचे वाटप** करतील. सोडत पध्दतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एम/पश्चिम विभाग यांना राहतील.

अर्ज करण्याची अंतिम दिनांक 22.11.2023 पर्यंत (दुपारी 1:00 वाजेपर्यंत)

**सही/- 09.11.2023**

**सहाय्यक आयुक्त एम / प विभाग**

एम/पश्चिम विभाग कार्यालय इमारत,

शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई – 400 071.